महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जावक क्रमांक : तंशिविकापु/विवि/अभातंशिप- Internship Portal/२०२१/ 8095 दिनांक : २६.१०.२०२१.

26 OCT 2021

**तातडीचे/महत्वाचे परिपत्रक:**
**(कालमर्यादा : दि. ०१.११.२०२१)**

प्रति,
संचालक/प्राचार्य,
विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीतील
अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली मान्यताप्राप्त
पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवी
तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था.

**विषय : अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे संकेतस्थळावरील Internship Portal वर नोंदणी करणेबाबत..**
**संदर्भ : तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचा दिनांक २६.१०.२०२१ रोजीचा ई-मेल वरील संदेश.**

उपरोक्त विषयास अनुसरुन, संदर्भीय ई-मेलनुसार प्राप्त झालेल्या निर्देशानुसार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे संकेतस्थळावरील **Internship Portal** वर संस्थांना नोंदणी करण्याकरीता **दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२१ पर्यंत मुदतवाढ** देण्यात आलेली आहे.

या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली मान्यताप्राप्त पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवी संस्थांना कळविण्यात येते की, ज्या संस्थांनी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे संकेतस्थळावरील **Internship Portal** वर अद्यापही नोंदणी केली नाही अशा संस्थांनी अंतिम दिनांकापूर्वी नोंदणी करुन घ्यावी. तसेच आपल्या संस्थेतील विद्यार्थ्यांनाही उपरोक्त पोर्टलवर नोंदणी करण्यास सूचित करावे. आपल्या संस्थेतील ज्या विद्यार्थ्यांनी **AICTE Internship Portal** नोंदणी केलेली आहे, अशा विद्यार्थ्यांची माहिती संचालनालयास सादर करण्याकरीता अद्ययावत ठेवावी.

ज्या संस्था **Internship Portal** वर नोंदणी करण्यास अयशस्वी ठरतील, अशा संस्थांवर **Approval Process Handbook (APH)** नुसार कारवाई करण्यात येईल याची सर्व संस्थाप्रमुखांनी नोंद घ्यावी.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे १६.

प्रत : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई (कार्यासन क्र. १७) यांना माहितीस्तव सादर.